पा-पुआक्र 1250
दि-11/12/2025

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## जाहिर लिलाव सन 2025-2026

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील काढलेल्या जुन्या पंपीग मशिनरी साहित्यांची विक्री करणे या कामाची जाहिर लिलाव गुरवार दि.18/12/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता अहिल्यानगर महानगरपालिकेच्या विळद पंपीग स्टेशन येथे जागेवर करण्यात येणार आहे. तरी इच्छुकांनी उपस्थित रहावे.

तसेच लिलावात सहभाग घेणे करिता रू.25000/- इतकी जाहिर लिलाव सहभाग फी महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागामध्ये बुधवार दि.17/12/2025 रोजी दूपारी 03.00 वाजता पर्यंत भरण्यात यावी सदरची रक्कम ना परतावा राहिल.

सदर लिलावाच्या अटी शर्ती अहिल्यानगर महानगरपालिकेच्या www.amc.gov.in या वेबसाईटवर पाहण्यास मिळतील.

उपायुक्त
अहिल्यानगर म हा न ग र पा लि का,

प्रत : १) संगणक विभाग प्रमुख, म.न.पा.अ.नगर यांना सदर ई - निविदा क्र. सन.२०१४-१५ मनपाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेसाठी (२ प्रती ) मंजूर रिपोर्टच्या छायांकित प्रतीसह.
२) प्रसिध्दी अधिकारी, प्रसिध्दी विभाग, म.न.पा.अ.नगर यांना सदर सुचना वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेसाठी (२ प्रती ) मंजूर रिपोर्टच्या छायांकित प्रतीसह.
3) हवालदार, यांना महानगरपालिकेच्या नोटीस बोर्डवर लावणेस

11/12/25

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

**सन.2025-26**

**जाहिर लिलाव नोटीस क्रमांक : / सन 2025 - 2026**

पाणी पुरवठा विभाग/ जाहीर लिलाव नोटीस जाहिरात क्र. दिनांक- /12/2025

मा.उपायुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका हे अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील काढलेल्या जुन्या पंपीग मशिनरी साहित्यांची जाहिर लिलावाद्वारे विक्री करणे कामांसाठी असलेल्या अटी व शर्ती खालिल प्रमाणे.

| निविदा क्रमांक | कामाचा तपशिल | कामाची निविदा रक्कम (G.S.T. व्यतिरिक्त) | जाहिर लिलाव सहभाग फी (ना परतावा) | दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 6 | 7 |
| पा पु वि/ जाहीर नोटीस क्र. / 2025-2026 | अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील काढलेल्या जुन्या पंपीग मशिनरी साहित्यांची विक्री करणे | 79,63,610/- | 25000/- | सोमवार दि.18/12/2025 रोजी सकाळी 11.00. वाजता |

**अटी - शर्ती**

1) इनकम टॅक्स प्रमाण पत्र प्रत मागील 3 वर्षाचे आवश्यक.
2) ई.पी.एफ.व जी.एस.टी.रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र प्रत.
3) आयकर पॅन कार्डची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे
4) समकक्ष केलेल्या कामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र, मागिल 3 वर्षात हाती घेतलेल्या व पुर्ण केलेल्य समकक्ष कामाच्या किमतीसह माहितीची कागद पत्रे
5) वार्षिक आर्थिक उलाढाल कमीत कमी 80 लाख रुपयांपेक्षा जास्त असायला पाहिजे. सदर कागदपत्रे अधिकृत सनदी लेखापाल (चार्टड अकांउटट) यांचेमार्फत स्वाक्षाकित करणे आवश्यक राहिल
6) ठेकेदार कोणत्याही शासकीय / निमशासकीय संस्थेकडुन काळया यादीत टाकण्यात आलेला ना याबाबतचे रु. 500/- च्या स्टॅम्प पेपरवर मा. तहसिलदार नोटरी पब्लिक यांचे कडील प्रतिज्ञा जोडणे आवश्यक आहे व

**इतर अटी शर्ती**

1) सदर लिलावात सर्वात जास्त देकार/ बोली लावणारे निविदाधारकाचे दर मंजूर करण्यात येतील (ग्राहय धरण्यात येतील)
2) कोणत्याही कराची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही
3) जुने निरूपयोगी भंगार साहित्य आहे त्याच स्थितीत प्रत्यक्ष ठिकाणावरून स्वखर्चाने यशस्वी लिलावधारक यांनी घेवून जावे लागेल
4) मंजूर दरपत्रकधारकाने सर्व रक्कम भरली नाही तर त्यापेक्षा कमी रक्कम नमूद केलेल्या दरपत्रकधारका कडून करण्यात येईल
5) देकार पूर्ण रक्कम भरल्या शिवाय भंगार साहित्य ताब्यात दिले जाणार नाही
मंजूर दरपत्रकाधारकाने भंगार साहित्य वेळेवर ताब्यात न घेतल्यास डॅमरेज (जागा भाडे ) प्रति दिन रू 5000/- फक्त याप्रमाणे आकारले जाईल

6) कोणतीही निविदा स्विकारणे, नाकारणे, मुदतवाढ देणे अथवा रदद करणे बाबतचे अतीम अधिकार मा आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांना राहतील

7) या निविदेतील अटी व शर्ती बाबत कोणतीही फेरबदल करण्याच ा अधिकार मा आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे या अटी व शर्ती बाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास मा आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांचा निर्णय अंतीम राहिल

8) कायदेशिर कार्यवाही अहमदनगर विभागातील न्यायालयाचे कक्षेत राहिल

9) लिलाव प्रक्रिया मा स्थायी समिती, अहिल्यानगर महानगरपालिका यांचे समक्ष व त्यांनी निश्चित केलेल्या वेळेतच होईल

10) यशस्वी बोली धारकास / ठेकेदारास नियमानुसार योग्य किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

11) कुठलेही साहीत्य मटेरीयल महानगरपालिका पुरविणार नाही

12) सर्व शासकीय कपाती निविदाधारक यांनी सोसावयाच्या आहेत.( वित्त विभागाचे परिपत्रक क्र.जी.एस.टी.1017/ प्र.क्र.81/कराधान-1दि.19/08/2017 प्रमाणे.) कोणतीही निविदा स्वीकारणे,नाकारणे अथवा रद्द करणे याबाबतचे अंतिम अधिकार मा आयुक्त, म न पा यांना राहील.

13) लिलावात काढलेले सर्व साहित्य व माल कार्यानलयीन वेळेत महानगरपालिकेच्या विळद पंपीग स्टेशन येथील ठिकाणी निविदा फॉर्म विक्री कालावधीत पाहण्यास मिळेल.

14) निविदा मंजूर केल्याचे आदेश काढल्यानंतर मशस्वी निविदाधारकास ठेकेदाराला निविदेत नमूद केलेली सुरक्षा ठेय तीन दिवसाच्या आत भरावी लागेल. सदर रक्कम जल अभियंता, पाणी पुरवठा विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या कार्यालयात जमा करावी लागेल. जर विहित मुदतीत ठेकेदाराने रक्कम भरली नाही तर बयाना रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच निविदाकाराच्या नावाचे काळ्या यादीमध्ये नोंद घेण्यात येईल.

15) यशस्वी ठेकेदारासा कामापोटी एकूण किमतीच्या एवढी 2.5% इतकी अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे अथवा बथाणा म्हणून भरलेली रक्कम अनामत सदरी वर्ग करणे बाबत गुळ पावतीसह लेखी पत्र दिल्यास सदर रक्कम वर्ग करुन उर्वरीत रक्कम अनामत म्हणून भरणा करता येईल.

16) या रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

17) मुंबई मुद्रांक अधिनियम अन्वये रुपये 10.00 लाखांपर्यंत रु.500/- व रु. 10.00. लाखाचे वरील प्रत्येकी रुपये लाख किंवा त्याचे भागास रु.500/- या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर रितसर करारनामा १० दिवसाचे आल करुन दयावा लागेल, विहीत मुदतीत अनामत रकमेचा भरणा केला नाही व करारनामा करुन दिला नाही तर त्याची निविदा रद्द करण्यात येवून त्यांचे निविदेसोबत भरणा केलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येवून महानगरपालिका फंडात जमा करण्यात येईल व मा.आयुक्त, महानगरपालिका यांना योग्य वाटेल अशा कोणत्याही निविदा धारकाकडून त्यांना योग्य वाटणा-या दराने अथवा फेर निविदा मागविणेस सक्षम राहतील

18) व्यवहारात महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान झाल्यास होणारे संपूर्ण आर्थीक नुकसान कसूरदार निविदाधारक यांचेकडून वसूल करण्यात येईल कसुरदार निविदा धारकाने सदर रक्कमेचा भरणा केला नाही तर फर्मचे नावासह फर्म चालक यांचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येईल व अहिल्यानगर महानगरपालिकेच्या पुढील कोणत्याही निविदा प्रक्रियेत संदर धारकांनी दाखल केलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.

19) निविदा मंजूर केल्याचे आदेश काढल्यानंतर यशस्वी निविदाधारकास ठेकेदाराला निविदेत नमूद केलेली सुरक्षा ठेव तीन दिवसाच्या आत भरावी लागेल. सदर रक्कम जल अभियंता, पाणी पुरवठा विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या कार्यालयात जमा करावी लागेल. जर विहित मुदतीत ठेकेदाराने रक्कम भरली नाही तर बयाना रक्कम जस करण्यात येईल. तसेच निविदाकाराच्या नावाचे काळ्या यादीमध्ये नोंद घेण्यात येईल.

20) निविदाकाराने सदर साहित्य उचलणे पूर्वी संपूर्ण रक्कम महानगरपालिकेकडे भरणे क्रमप्राप्त राहिल. सर्व साहित्य महानगरपालिकेच्या विळद पाणी पुरवठा केंद्र येथील आवारातून घेऊन जाण्याचा आदेश प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत स्वार्थाने घेऊन जाणे क्रमप्राप्त आहे. सदर अटीचे उल्लंघन केल्यास दैनदिन रू. 1000/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल व सदर दंड दंडाची रक्कम सुरक्षा ठेवीतून वसूल करण्यात येईल, 15 दिवसाचे आत सदरची रक्कम न भरल्यास सदरची भरलेली रक्कम जप्त करण्यता येईल याची नोंद घ्यावी, भरलेली रक्कम जप्त करण्यात येईल आदेश प्राप्त झालेनंतर सर्व साहित्याची जबाबदारी ही निविदाधारकाची असेल त्यास महानगरपालिका कुठल्याही प्रकारे जयाचदार राहणार नाही.

21) पात्र निविदाधारकास कायद्याप्रमाणे लागू होणारे सर्व कर स्वतः भरण्याची जबाबदारी स्थिकाराची लागेल ही बाब मान्य असल्यावरच ई-लिलावात भाग घेता येईल.

22) साहित्य भरताना नेतना इतर कुठल्याही मशिनरी व इमारतीस बाधा किया तुटफुट होणार नाही याची जबाबदारी निविदाधारकाची राहिल

23) निविदाधारकाने महानगरपालिकेच्या आवारातून साहित्य नेतानाचे व्हीडीओ शुटींग व फोटो काढून जमा करण्यात यावे त्यानंतरच. त्यांनी भरलेली बयाना रक्कम परत करण्यात येईल

24) कोणतीही निविदा स्विकारणे, नाकारणे, मुदतवाढ देणे अथवा रद्द करणे याबाबतचे अंतिम अधिकार मा आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका यांना राहतील.)

25) अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील काढलेल्या जुन्या पंपीग मशिनरी साहित्यांची विक्री करणे या कामाचा लिलाव दि.18/12/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता विळद पंपीग स्टेशन, अहिल्यानगर महानगरपालिका येथे करण्यात येणार आहे

26) या निवितील अटी शर्ती बाबत कोणताही फेर फार करण्याच ा अधिकार मा आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिजका
यांनी राखून ठेवला आहे या अटी शर्ती बाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झालयास त्याचा मा आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिक यांचा निर्णय अंतीम राहिल

उप अभियंता | जल अभियंता | उपायुक्त
अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

पृत : 1) संगणक विभाग , अहिल्यानगर महानगरपालिका यांना सदरची लिलाव जाहिरात महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी

2) प्रसिध्दी विभाग प्रमुख, मनपा.अ.नगर यांना सदरची जाहीर नोटीस वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेसाठी

2) म्यु.पल हवालदार, मनपा.अ.नगर यांस सदरची नोटीस मनपाच्या नोटीस बोर्डवर डकावणेसाठी.